इतर मागासवर्गीय जातीमधील उन्नत आणि प्रगत व्यक्ति/गट [ Creamy Layer ] वगळून आरक्षणाचे फायदे देण्याबाबत निकष निश्चित करण्याबाबत.

GR1994061601

महाराष्ट्र शासन,
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
शासन निर्णय, क्रमांक सीबीसी-१०९४/प्र.क्र. ८६-मावक-५,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२, दिनांक १६ जून १९९४.

वाचा :- १] केंद्र शासन, मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल, पब्लिक ग्रिव्हन्सेस अँड पेन्शन्स [डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल अँड ट्रेनिंग] कडील कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ३६०१२/२२/९३-इस्टटीटी [एससीटी] दिनांक ८ सप्टेंबर १९९३.

२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च १९९४.

प्रस्तावना :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च १९९४ अन्वये मंडल आयोगाच्या शिफारशींनुसार इतर मागासवर्गीयांना शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण देण्याबाबत आदेश निर्गमित झालेले आहेत. मंडल आयोगाने त्यांच्या अहवालात सूचित केल्याप्रमाणे आणि सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्रमांक [सिव्हील] ९३०/१९९० इंदिरा सहानी व इतर विरुध्द भारत सरकार व इतरमध्ये निदेशित केल्यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या वर्गातील [इतर मागासवर्गीय] उन्नत आणि प्रगत व्यक्ति/गट [ Creamy Layer ] निश्चित करुन त्यांना आरक्षणाच्या आणि तदनुषंगाने इतर फायद्यांच्याकक्षेतून वगळण्यासाठी निकष ठरविण्याच्या दृष्टीकोनातून जो निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे त्याबाबतचे आदेश समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागाकडून निर्गमित करण्यात यावेत असे सदर आदेशातील परिच्छेद क्र.४ मध्ये निर्देशित केले आहे. या निदेशानुसार इतर मागासवर्गीयांतील प्रगत आणि उन्नत / व्यक्ति/गट [ Creamy Layer ]निश्चित करण्यासाठीचे निकष म्हणून खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.:-

शासन निर्णय :- केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या न्यायाधीश, राम नंदन प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली समितीने या संदर्भात ज्या शिफारशी दिनांक १० मार्च, १९९३ रोजी केंद्र शासनाला दिल्या आणि केंद्र शासनाच्या कल्याण मंत्रालयाने त्या मान्य केल्या आहेत त्या सर्व शिफारशी खाली नमूद केलेल्या सुधारणांसह उन्नत व प्रगत व्यक्ति/गट [ Creamy Layer ] निश्चित करण्याचे निकष राज्य शासन स्वीकृत करण्याचा निर्णय या आदेशाद्वारे घेत आहे.

१. कमाल शेतीधारणासंदर्भातील अधिनियमातील बागायत क्षेत्र धारणेच्या पात्र मर्यादेच्या ८५ टक्के पर्यंत क्षेत्रधारणा करणाऱ्या व्यक्तिंना उन्नत आणि प्रगत व्यक्ति अथवा गट म्हणून गणले जाणार नाही.

-२-

२. ज्या व्यक्तिंच्या धारणा केलेल्या क्षेत्रात विहिर बागायत क्षेत्र आहे त्या व्यक्तिंबाबत असे ~~विहिर~~ विहिर बागायत क्षेत्र बागायत न धरता जिरायत धरले जाईल, कारण सर्वसाधारण: विहिरीमधून मुबलक स्वरूपात पाणी उपलब्ध होत नाही.

३. ग्राम स्तरावरील बलुतेदार यांना वंशपरंपरागत उद्योग किंवा धंदा करणारी व्यक्ति समजण्यात येऊन त्यांना उन्नत आणि प्रगत व्यक्ति/गट धरले जाणार नाही.

४. हौशी खेळाडू आणि क्रिडा क्षेत्रातील धंदेवाईक खेळाडू व्यक्ति यांना उन्नत आणि प्रगत व्यक्ति अथवा गट म्हणून गणले जाणार नाही.

हे आदेश भटक्या जमाती (क) धनगर व तत्सम जाती, भटक्या जमाती (ड) वंजारी व तत्सम जाती आणि इतर मागासवर्गीय यांना लागू राहतील.

वरील प्रमाणे निर्णयाच्या अधीन राहून ज्या व्यक्ति उन्नत आणि प्रगत व्यक्ति अथवा गट म्हणून गणल्या जातील त्याबाबतचे निकष या आदेशासोबतच्या अनुसूचीमध्ये विहित केलेले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/- (संदीप बागची)
सचिव, (समाजकल्याण व क्रिडा)

प्रति,

राज्यपालांचे सचिव/मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधानसचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय(मूळ शाखा)/अपिल शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त आणि उपलोकायुक्तांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सा. प्र. वि. (१६-ब) मुंबई,
सचिव, सर्व ~~प्रादे~~ प्रादेशिक निवड मंडळे/सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण पुणे/आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे/संचालक सेवायोजन, मुंबई,
महालेखापाल/महाराष्ट्र १-२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल/महाराष्ट्र-१-२ (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या आधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड नस्ती मावक-५,
* पत्राने.